आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १३६ वा ● बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## निवडणूक खर्च निरीक्षक डॉ. रामसिंह गुर्जर यांचे लातूर येथे आगमन

लातूर, : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक डॉ.रामसिंह गुर्जर यांचे लातूर येथे आगमन झाले आहे. विधानसभा निवडणुकीत औसा, निलंगा व उदगीर मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाबाबत संनियंत्रण करण्यासाठी गठीत पथकांच्या कामकाजावर ते देखरेख ठेवणार आहेत. लातूर शहरातील औसा रोडवरील नवीन शासकीय विश्रामगृह येथे पहिल्या मजल्यावरील कावेरी कक्षामध्ये डॉ.रामसिंह गुर्जर यांचे कार्यालय असून त्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२९९४९१ आहे, तर ७६२०५५२८६१ हा भ्रमणध्वनी क्रमांक आहे. सर्वसामान्य नागरिकांना उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबत तक्रार करावयाची असल्यास किंवा या अनुषंगाने काही माहिती द्यावयाची असल्यास त्यांनी शासकीय विश्रामगृह येथील निवडणूक खर्च निरीक्षक यांच्या कार्यालयात अथवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज; उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर संनियंत्रणासाठी पथके गठीत - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, : भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत संबधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा पुरवठा अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक तथा आदर्श आचारसंहिता कक्षाच्या नोडल अधिकारी कल्पना क्षीरसागर यांच्यासह पत्रकार बांधव यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्रांची छाननी ३० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ पासून सुरु होईल. तसेच उमेदवारी माघे घेण्याची मुदत ४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ पर्यंत असून निवडणूक चिन्ह वाटपाची कार्यवाही ४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ नंतर सुरु होईल. तसेच २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. सर्वसाधारण तथा अराखीव संवर्गातील उमेदवारांना १० हजार रुपये आणि अनुसूचित जाती व




अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांना ५ हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. प्रत्येक उमेदवाराला ४० लाख रुपयेपर्यंत निवडणूक खर्चाची मर्यादा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर भरारी पथके, चेकपोस्ट, व्हिडीओ सर्व्हीलंस टीम आदी विविध पथके गठीत करण्यात आली आहेत. यामाध्यमातून प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक बाबीवर लक्ष राहणार असून या काळात मतदारांना आमिष दाखविणे, धमकाविणे आदी कोणतेही गैरप्रकार होवू नयेत, यासाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सतर्क असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक काळात आदर्शआचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने आंतरराज्य सीमेवर चेकपोस्ट उभारल्या आहेत. तसेच पोलीस विभागामार्फत आदर्श आचारसंहिता भंग, सोशल मिडियावर फेक न्यूज, द्वेषपूर्ण मजकूर प्रसिद्ध केल्यास कारवाई करण्यात येत आहे. यासोबतच मद्य, गुटखा आदी पदार्थ्यांच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कार्यवाही सुरु केली असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले. तसेच निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था कार्यं राखण्यासाठी गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असलेल्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई, शस्त्रे जमा करून घेण्याची कार्यवाही केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

**व्होटर सर्व्हिस पोर्टल आणि व्होटर हेल्पलाईन मोबाईल ॲप**

मा. भारत निवडणूक आयोगाने सुरु केलेल्या https://voters.eci.gov.in/ या पोर्टलद्वारे मतदारांना मतदार यादीतील नाव शोधणे, मतदान ओळखपत्रातील दुरुस्तीसाठी किंवा मतदान ओळखपत्रासाठी ऑनलाईन अर्ज, मतदान केंद्र शोधणे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहत. व्होटर हेल्पलाईन मोबाईल ॲपद्वारे मतदारांना वरील सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक यंत्रणेने केलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.

**मतदारसंघनिहाय नामनिर्देशन पत्र सादर करावयाचे ठिकाण**

२३४- लातूर ग्रामीण- पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर.

२३५- लातूर शहर- कोर्ट हॉल, पहिला मजला, तहसील कार्यलय, मेन रोड, लातूर.

२३६- अहमदपूर- तहसीलदार यांचा कक्ष, तहसील कार्यालय, अहमदपूर.

२३७- उदगीर (अ.जा.)- तहसीलदार, उदगीर यांचे दालन, महसूल भवन, उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर.

२३८- निलंगा- तहसीलदार, निलंगा यांचे दालना शेजारी कोर्ट हॉल, तहसील कार्यालय, निलंगा.

२३९- औसा- निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसील कार्यालय, औसा.

## ऑनेस्टी पब्लिक स्कूलमध्ये आरोग्य शिबीर संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) शहरातील छत्रपती



शिवाजी नगर येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल युनिट २येथील सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी व आहारा विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी माजलगाव येथील डॉ.मोहर जाधव ( दंतरोग तज्ञ) यांनी दातांची काळजी कशी घ्यायची,रोज सकाळ - संध्याकाळ ब्रश करण्यापासून ते बाहेरील गोड पदार्थ,चॉकलेट चे अतिसेवन न करणे याविषयी चिमुकल्यांना मार्गदर्शन केले.ग्रामीण रुग्णलयाच्या आरोग्य अधिकारी डॉ.योगिता भगत यांनी आहार मार्गदर्शन,मोबाईल चा अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्घाटन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.यावेळी शाळेच्या प्राचार्या अमृता रामेश्र्वर तोर यांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ,स्कूल कोऑर्डिनेटर सुप्रिया निलेश गरुड,संगीत शिक्षिका श्रुती कुलकर्णी,सुशीला जोशी,खोसरे ताई यांनी परिश्रम घेतले.

## देशातील महिला अत्याचार रोखण्यासाठी शक्ती कायदा पारित करा - ॲड.आरती ताई कांडूरे/गाडेकर

माजलगाव,(प्रतिनिधी):महाराष्ट्रात



माता जिजाऊ,राजमाता अहिल्यादेवी,माता सावित्रीबाई,माता रमाई यांच्या लेकी सुरक्षित नसतील तर बेटी बचाव बेटी पढावो.नुसतेच नावाला काय?असा सवाल उपस्थित करत देशातील महिला अत्याचार रोखण्यासाठी शक्ती कायदा पारित करा,अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या तथा ड.आरती कांडूरे/गाडेकर यांनी केली.

राज्यातील कायदा,सुव्यवस्था व प्रशासन सक्षमपणे चालवण्यासाठी व दिवसेंदिवस रोज माता भगिनी वरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी सभागृहात ५०% महिला प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे.महाराष्ट्रात माता सावित्रीबाईंच्या लेकी सुरक्षित नसतील तर बेटी बचाव..बेटी पढाओ..नुसतेच नावालाच का? सभागृहात ५०% महिला प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे.त्याचबरोबर संभाजीनगर येथील १३ वर्षीय खेळाडू मुलीवर व जालना जिल्ह्यातील आठ वर्षीय निरागस बालिकेवर अत्याचाराचा जाहीर निषेध केला.महिलांचे संरक्षण होण्यासाठी व पीडितांना न्याय देऊन नराधमांना कठोर शिक्षा करण्यासाठी व देशातील महिला अत्याचार रोखण्यासाठी शक्ती कायदा पारित करण्याची गरज असून शक्ती कायदा पारित करण्यासाठी सभागृहात ५०% महिला प्रतिनिधित्व पाठवा,असे आवाहन कायदेतज्ञ ड.आरती कांडूरे/गाडेकर यांनी केले आहे.

# खा. अशोक चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भोकर येथे भाजप कार्यकर्त्यांचा मार्गदर्शन मेळावा संपन्न

**वंचित चे सुमेश फुगले यांचा भाजपमध्ये प्रवेश**

भोकर /सिद्धार्थ जाधव/ होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भोकर येथे भाजप कार्यकर्त्यांचा मार्गदर्शन मेळावा घेण्यात आला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे माजी भोकर तालुका महासचिव सूमेश फुगले सायाळकर व वंचित चे ओबीसी तालुका महासचिव साईनाथ पांडुरंग हामंद धानोरकर या दोघांनी गावचा विकास साधनेच्या हेतूने मा.मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे काँग्रेस मधून भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून काँग्रेस मधील व इतर पक्षातील अनेक माजी आमदार,माजी खासदार , नगरपरिषदेचे नगरसेवक,ग्रामपंचायत अनेक सरपंच,सदस्य,पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विविध पक्षातून भाजपमध्ये प्रवेश केला आहे, अजूनही करत आहेत.

८५-भोकर विधानसभा मतदारसंघासाठी भाजपकडून मा.मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण यांची अधिकृत उमेदवारी घोषित झाल्या नंतर पहिल्यांदाच भोकर येथील गणराज रिसॉर्ट येथे दिनांक २२



ऑक्टोबर रोजी निवडणुकीच्या अनुषंगाने खा. अशोक चव्हाण,विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या अधिकृत उमेदवार श्रीजय अशोक चव्हाण, मा.आमदार अमर राजूरकर, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वरील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गेल्या वर्षापासून भारिप तसेच वंचित बहुजन आघाडी मध्ये सक्रिय पणे काम करणारे भोकर तालुका महासचिव, भोकर तालुका सरपंच संघटनेचे उपाध्यक्ष,सुमेश फुगले यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. सोमेश फुगले यांनी २००९ मध्ये भारिप कडून पिंपळढव गटामधून जिल्हा परिषद लढवली होती. यासह तालुक्यातील मौ. सायाळ ग्रामपंचायत निवडणूक लढवून विजयी झाले व विद्यमान सरपंच पदी कार्यरत आहेत.

गावचा विकास करण्याच्या हेतूने कमळ हाती घेतल्याच्या प्रतिक्रिया सुमेश फुगले यांनी पक्षप्रवेश करण्यामागचे कारण सांगताना आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

यांच्यासह वंचित मध्ये मागील पाच वर्षापासून काम करणारे ओबीसी तालुका महासचिव साईनाथ पांडुरंग हामंद धानोरकर यांनीही यावेळी भाजप पक्षप्रवेश केला आहे.

यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, किशोर पाटील लगळूदकर, मा. नगरसेवक डॉ. राम नाईक, भोकर तालुका प्रभारी समन्वयक, मा. नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर,भगवानराव दंडवे, संचालक गणेश पाटील पोमनाळकर,तालुकाध्यक्ष गणेश पाटील कापसे, शहराध्यक्ष विशाल माने,अत्रिक पाटील, मुंगल आदींसह भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट व महायुतीतील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाच कोटी जप्त प्रकरणावरुन राजकारण तापले; पोलीस अधीक्षक म्हणाले..

पुणे : विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केलीय. अशातच सोमवारी (२१ ऑक्टोबर) पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर सुरू असलेल्या नाकाबंदीत पुणे पोलिसांकडून ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम सत्ताधारी आमदाराची असल्याचे बोलले जात असून यावर शिवसेना (उध्दव ठाकरे) नेते संजय राऊत तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आम दार रोहित पवार यांनी देखील भाष्य केलेय. मात्र, याबाबत पुण्याचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांना विचारले असता, या पैशाचा राजकीय संबंध काय? याचा अधिक तपास करत असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिक तपास सुरू : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेच्या दृष्टीनं नाकाबंदी करत असताना पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटी रूपयांची रोख रक्कम जप्त केली. ज्या गाडीसह ही रक्कम जप्त करण्यात आली ती कार चह ४५ अड २५२६ या क्रमांकाची असुन ती सांगोल्यातील अमोल नलावडे या व्यक्तीच्या नावावर असल्याचं समोर आलंय. रक्कम नेमकी कुठे नेली जात होती? या रक्कमेचा वापर कशासाठी होणार होता? याबाबत अधिक तपास सुरू आहे.

सर्व नोटा ५०० रुपयांच्या : याबाबत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख म्हणाले की, ''काल संध्याकाळी जवळपास सव्वा सहाच्या सुमारास खेड शिवापूर टोल नाक्यावर एक पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार चेक करण्यात आली. या कारमध्ये काही रक्कम असल्याचे आढळले. त्यानंतर कार पोलीस स्टेशनला नेण्यात आली. तिथे निवडणूक अधिकारी तसंच प्रशासनाला बोलवण्यात आले आणि व्हिडिओ ग्राफी करत पंचनामा करण्यात आला. पंचनामा केल्यावर, जवळपास ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त केली आणि आयकर विभागाकडे पुढील चौकशीसाठी ही रक्कम देण्यात आली. सर्व नोटा या ५०० रुपयांच्या असून पूर्ण रक्कम ही ५ कोटी रुपयांची आहे. ही कार कोणाची आहे? याबाबत अधिक तपास सुरू आहे. कार मुंबईवरून कोल्हापूरला जात होती. खेड शिवापूर येथे तपासणी केली असता ही रक्कम आढळून आली.




## १५ वर्षीय प्रेयसीवर १९ वर्षीय प्रियकराचा बळजबरीने बलात्कार; दगाबाज प्रियकराला अटक

ठाणे : एका १९ वर्षीय प्रियकरानं १५ वर्षीय प्रेयसीला लग्नाचं आमिष दाखवून बहाण्यानं स्वत:च्या घरी नेलं. त्यानंतर अल्पवीयन प्रेयसीशी शारीरिक संबंधास तगादा करत असतानाच, पीडित प्रेयसीनं संबंधास नकार दिला. मात्र नकार देवूनही दगाबाज प्रियकरानं प्रेयसीवर बळजबरीनं बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना भिवंडी शहरानजीक असलेल्या एका गावातील इम ारतीच्या पाठीमागे घडली. याप्रकरणी अल्पवीयन प्रेयसीच्या फिर्यादीवरून प्रियकरावर नारपोली पोलीस ठाण्यात अत्याचारासह पोक्सोन्वये गुन्हा दाखल करण्यात आला तसंच पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

प्रेयसीला लग्नाचं आमिष - पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवीयन पीडित प्रेयसी भिवंडी तालुक्यातील काल्हेर येथील एका सोसायटीत राहात आहे. तर ती राहत असलेल्या परिसरात दुसऱ्या सोसायटीत दगाबाज प्रियकर राहात आहे. त्यातच एकाच भागात राहात असल्यानं दोघांची ओळख झाली. या ओळखीतून दोघांमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये जवळीक निर्माण होऊन प्रेमसंबंध जुळून आले. त्यानंतर प्रेम संबंधातून आरोपी प्रियकरानं पीडित प्रेयसीला लग्नाचं आमिष दाखवून शारीरिक सुखाची मागणी केली. मात्र पीडित प्रेयसीनं त्यास नकार दिला. त्यानंतर पीडित प्रेयसीला आरोपी प्रियकरानं त्याच्या घरी बोलावून प्रेयसीवर इच्छेविरुद्ध जबरीनं बलात्कार केला.

आरोपीला ठोकल्या बेड्या - आता याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून प्रथम दादर रेल्वे पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर २१ ऑक्टोबर रोजी सदर गुन्हा ००२४ नंबरने भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात येवून दगाबाज प्रियकराच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१) , ६५ (१) सह पोक्सो कलम १२, ४, ८, कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के; हदगाव तालुक्यात केंद्रबिंदू

नांदेड : नांदेड शहर व तसेच अर्धापूर, हदगाव या तालुक्यातून आज दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ०६.५२ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली.

अधिकृतरित्या दिलेल्या वृत्तानुसार या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केल वर ३.८ अशी नोंदविण्यात आलेली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड शहरापासून २९ किमी दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातील सावरगाव या गावात असून या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली असल्याचे जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्राचे अधिकारी किशोर कुऱ्हे यांनी दिली आहे.

## लॉरेन्स बिश्नोईला विधानसभा लढण्याची ऑफर, थेट झिशान सिद्दिकींविरोधात मैदानात उतरवण्याची तयारी!

मुंबई बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानला बिश्नोई टोळीकडून वारंवार धमक्या मिळत आहेत. काळवीट शिकार प्रकरणात लॉरेन्स बिश्नोई सलमानच्या मागे हात धुवून लागला आहे. बिश्नोई टोळीकडून सलमानला वारंवार धमक्या मिळत आहे य राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर आता देशभरात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचं नाव चर्चेत आहे. लॉरेन्स बिश्नोई आता राजकारणात एन्ट्री करतो की काय? अशी चर्चा सुरू झाली आहे. लॉरेन्स बिश्नोई याला आता थेट महाराष्ट्र विधानसभा निवडणूक लढवण्याची ऑफर आली आहे.

वांद्रे पूर्व विधानसभा मधून आमदार झिशान सिद्दीकी विरोधात लढवण्यासाठी उत्तर भारतीय विकास सेनेकडून लॉरेन्स बिश्नोईला ऑफर आली आहे. बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणी लॉरेन्स बिश्नोईच्या काही शूटर ला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. अभिनेता **(पान ४ वर) ...**

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – विधानसभा निवडणूकीचे वारे वाहत असताना महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्षा मध्ये जी कांही हमरीतूमरी हो-ते आहे, त्यामूळे मतदारानी कोणाकडे कल द्यावा हा अंदाज काढता येत नाही, पंरतू रंगतरंगत पाहायाला मिळत आहेत. त्यामूळे काय गुपीत असावे, हे कळत नाही, डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, महाराष्ट्रात उद्योग नाही, कारखाणदारी, व्यापारी अवस्था बिघडली आहे. शेती कधी नापिकी, तर कधी अवकाळी पावसामुळे ती उरली नाहीत, बेरोजगारी, सुशिक्षीत बेकारांचे प्रश्न वाढले आहेत, त्यामूळे निवडणूकीच्या हंगामात या प्रश्नाला भिडणार कोण, हा प्रश्न असल्यामूळे विधानसभा निवडणूकीचा प्रश्न ज्याचां त्यांचा असावा, तूला काय देणे, घेणे गप्प बसनां.

एक – अहो, असे कसे काय बोलता, भारतीय सत्ताकारणात मतदानाला महत्व आहे. प्रत्येक महिला पुरुषांना मतदानाचा हक्क असताना खरे, खोटे काय समजून, ज्यांनी, त्यांनी त्या, त्या उमेदवाराला मतदान करणे गरजेचे असते. तुम्ही कशाला फाटा फोडता.

दुसरा – अरे, बेरोजगार कामगार, सुशिक्षीत बेकार, उपासपोटी आहेत, सत्ताकारणी विरोधी लोकप्रतिनिधी आपापली पोळी भाजून घेत आहेत. त्यामूळे सर्वसामान्य मतदाराना कोणाचे देणे, घेणे नसावे आणी असावे तरी कशासाठी, म्हणून बोलतो आहे.

एक – अहो, निवडणूकीच्या काळा मध्ये फायदा, तोडा न पाहाता सत्ताकारणा मध्ये आणि विरोधी पक्षा मध्ये कोणते सक्षम उमेदवार लोकप्रतिनिधी असावेत याची जाणीव ठेवूनच मतदान केले पाहीजे, त्यासाठीचीच ही निवडणूक प्रक्रिया असताना तूम्ही दुसरीकडेच वाटा, पळवाटा काढून दिशाभूल करुन वेगळे वळण लावता हे योग्य नसावे असे वाटते.

दुसरा – अरे, तूझे डोकं ठिकाण्यावर आहे काय, सत्ताधारी किंवा विरोधक असोत हे लोकप्रतिनिधी निवडणूक काळातच मतद–रा समोर येतात, आणि पुन्हा करभला, तर होगा भला, हे समिकरण डोळ्यासमोर ठेवून ते सत्ताकारण आणि विरोधीकारण करीत असतात हे आजवरचा अनुभव तूझ्या लक्षात नाही काय, मग कशाला बडबड करतोस.

# मोदीजीचा कळस, न्यायदेवता डोळस !

## संपादकीय...

जागतीक राजकारण, सत्ताकारण, धर्मकारण, आणि सामाजीक न्यायकरणातील न्यायदेवता ही डोळ्यावर पट्टी बांधून न्याय देत होती. डोळ्यावरची पट्टी कोणी कधी बांधली हे माहिती नाही. तसा इतिहास असला तरी न्यायदेवता ही, एका महिलेच्या हाती तराजू, आणि तिच्या डोळ्यावर काळी पाट्टी बांधलेली असल्यामूळे समोरच्या बाकावरील वादी, प्रतिवादीचे म्हणणे एकूण आंधळ्या न्यायदेवते समोर बसलेले न्यायाधिश हे आजवर न्याय की अन्याय, हा निकाल देत राहीले, ती प्रथा भारतासह जगभरात चालू आहे. हे कोणी ही नाकारु शकत नाही.

भारतीय सत्ताकारणात भारताला सर्वकस महासत्ता बनवू पाहाणाऱ्या प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या भावनेतील जी कांही प्रक्रिया उमटली तिचा कळस झाला, आणि न्याय देवतेला डोळस करण्याचा मास्टर स्टोक ज्यांच्या कार्यकीर्दीत झाला, त्यांचेच नांव प्रधान मंत्री नरेंद्र मोदी असावे अशीच कुजबूज सर्वसामान्य लोकातून व्यक्त होत असल्याने मादीजीचा कळस, न्यायदेवता डोळस बनली असे म्हटल्यास वावगे ठरुनये, कारण शब्दादीत अर्थ अनर्थाला अनादीकाळापासून संदर्भ आहेत. ते संदर्भ पुराव्याशिवाय कोणी ही नष्ट करु शकत नाही. अधुनिक जगतात भारत हा शैक्षणीक दृष्ट्या प्रबळ असला तरी तंत्रज्ञान शास्त्रीय दृष्टीकोणातून तो कमकुवत असताना भारतीय सत्ताकारणातील मास्टर स्ट्रोक सत्ताकारणी असलेल्या मोदीजीनी न्याय देवतेलाच गुलाम केले की काय अशी ही शंका कुशंका कायदे पंडीतात चर्चीली जाताना दिसते आहे. याचे कारण असे की, स्वतंत्र भारताच्या सत्ताकारणात जे कोणी सत्ताकारणी प्रधान मंत्री झाले त्यांनी न्यायदेवतेच्या डोळ्यावरची पट्टी काढण्याचे धाडस केले नाही. पंरतू अनाधिकाळापासून न्याय देवतेवर काळी पट्टी असताना त्यानंतर न्याय देवतेचे डोळे डोळस करण्याचा माणस अंगीकारुन न्याय देवतेचे डोळे उघडण्याचा प्रताप प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनीच केला की काय, किंवा भार-ताचे सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधिश आंधळे झाले की काय, अशीच उलटसूलट कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

स्वतंत्र भारताच्या प्रत्येक न्यायालया समोर मग, मुंबई उच्च न्यायालय असो किंवा दिल्लीचे सर्वोच्च न्यायालय असो, त्या ठिकाणी न्याय देवता ही डोळ्यावर पट्टी असलेलीच आहे. ती मूर्ती कोण्या महिलेची कशासाठी कोणी कशी बसवीली, या बद्दल आज चर्चा कारण नस-ावे पंरतू राजस्थान सरकारच्या जयपुर राजधानी मध्ये उच्च न्यायालयात मनूस्मृतीकार मनूचा पूतळा १९८९ मध्ये उभारला गेला. तो आजतागायत दिमाखात उभा आहे. त्याचे कोणी कौतूक करीत नाही, वर्णभेदानुसार न्याय द्या असे मनूस्मृती सांगते, हा प्रकार कोणाही भारतीय नागरीकास मान्य होणार नाही. पंरतू नाक कापले तरी, श्वास घेण्यासाठी जागा आहे, असे म्हणणाऱ्या समोर न्याय देवतेवरती काळी पट्टी काढण्याचा काय बोलावे, हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

भारतीय सत्ताकारण, न्याय कारण, हे भारतीय संविधानावर अवलंबून आहे. त्याच न्यायीक तत्वावर प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे गेल्या बारा वर्षापासून भारतीय सत्ताकारण करीत असताना न्याय संस्थेलाच हाताशी धरुण न्याय देवतेवरची पट्टी काढून घेवून त्यांना काय अभिप्रेत असावे अशी उलटसूलट कुजबूज सर्वसामान्य जनतेतून होताना दिसते आहे. कारण असे की, प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ईडी,सीबीआय, वगैरे संस्था मार्फत विरोधकावर धाडसत्र टाकायचे आणि विरोधी पक्षाला कमकुवत करणे, हे सत्र चालू ठेवून आजवर सत्ताकारण केले गेले. या संदर्भात विरोधकानी ही न्यायालयात सत्य, असत्य काय आहे ते पाहाण्यासाठीच्या याचीका दाखल केल्यामुळे चक्क न्याय देवतेच्या डोळ्यावरील काळी पट्टी उघडी करुन प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्ताकारणाचा कळस गाठला आणि न्याय देवतेला डोळस केले. जेणेकरुन विरोधकानी अन्यायाला वाचा फोडूच नये अशीच त्यांची समजूत असावी की काय, अशीच कुजबूज प्रसार माध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता भारतीय सत्ताकारण हे लोकशाही संविधानावरच अवलंबुन असल्याने सामाजीक न्याय, कायदा व सुव्यवस्था याचे भान ठेवूनच सत्ये असत्याचा न्याय निवाडा करणे अभिप्रेत असताना भारतीय सत्ताकारण हे अनाधिकाळातील संदर्भ घेवून आजघडीला आंधळ्या न्याय देवतेला डोळस करण्याचा प्रयत्न करताना ही बाब सामाजीक न्यायाला बगल देणारी ठरावी अशीच कुजबूज होताना दिसते आहे.

# पाळज येथील स्थिर सहनियंत्रक पथकाने पकडले १२ लाख ५० हजार रुपये

भोकर –विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भोकर तालुक्यातील पाळज या ठिकाणी स्थिर पथकाकडून २२ ऑक्टोबर २०२४ रोजी मध्यरात्री १ वाजेच्यासुमारास एका चार चा की वाहनात १२ लाख ५० हजार रुपये सापडले आहेत. जप्त केलेली रक्कम तहसील कार्यालयाकडे जमा केली असून रक्कमेचा निवडणुकीशी संबंध आहे की, नाही याची माहिती प्राप्त झाली नसून पोलीसांनी या बाबत आयकर विभागाला तपासणी करण्याचे सुचविले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने भोकर विधानसभेत मतदार संघात दोन ठिकाणी स्थिर नियंत्रण पथक लावण्यात आले असून तेलंगणा सीमेलगत असलेल्या पाळज येथील बंदोबस्तासाठी लावण्यात आलेल्या स्थिर सहनियंत्रण पथकाने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी



मध्यरात्री १ वाजेच्यासुमारास एम.एच.२० सी.एच.४३३४ स्विफ्ट डिझायर कंपनीची चार चाकी गाडी हिमायतनगर कडून पाळज मार्गे भैसा (तेलंगणा) कडे जात असताना थांबून येथे कार्यरत पोलीस अंमलदार जेकुट, राठोड, केंद्र प्रमुख ग्रामपंचायत अधिकारी यु.व्ही. केंद्रे, एम.एन.शेख, बी.डी.कनोजवार हे वाहनांची तपासणी करत असतांना या गाडीमध्ये पाठीमागील सीटच्या पायदानाजवळ नायलॉन पोत्याची तपासणी केली असता त्यात १२ लाख ५० हजार रुपये होते. स्थिर सहनियंत्रण पथकाने याचा पंचनामा तयार करून या गाडीमध्ये विजय बाबु चव्हाण (४२) रा. कांचली ता. किनवट, सुरेश सर्जेराव मोरे रा. छत्रपती संभाजीनगर, संतोष काशीनाथ अंभोरे (४१) रा. पेडगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर असे तिन व्यक्ती होते.पोलीसांनी या रक्कमेची माहिती आयकर विभागाला दिली आहे. पैसे कोणाचे आहेत, कोणाकडे जात होते , या पैशाचा निवडणुकीची काही संबंध आहे का ? याबद्दलचा अधिक तपास निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# संत गोरोबा मागासवर्गीय सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्थेन लातूर शहर विधानसभा निवडणुकीसाठी दिला जाहीर पाठिंबा

लातूर (प्रतिनीधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्हाचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची आज मंगळवार दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी संत गोरोबा मागासवर्गीय सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था लातूरच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन लातूर शहर विधानसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेस



महाविकास आघाडीच्या उमेदवाराला त्यांनी बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला. संत गोरोबा मागासवर्गीय सहकारी भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था लातूरचे अध्यक्ष सतीषराव बाबुराव कांबळे,सचिव देविदास भागुरामराव गायकवाड,प्रकाश सूर्यवंशी,सूर्यभान पुरी,सचिन शिंदे,काशिनाथ हिरा वाघमारे, अश्विनी संदीप गायकवाड,राजू जीवन गायकवाड,प्रकाश सोनबा पाडोळे,लिंबराज धोंडीबा मगर, मंगलबाई भाऊसाहेब गायकवाड, कोंडाबाई गुलराज पवार,अर्जुन देडे,विशाल कांबळे आदि उपस्थित होते.

# उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांच्या पक्षाच्या बैठका सुरु, निवडणुकीनंतर हे एकत्र येतील, प्रकाश आंबेडकराचा गौप्यस्फोट

मुंबई : विधानसभा निवडणुका झाल्यानंतर उद्धव ठाकरे आणि भाजप एकत्र येतील अशी भीती व्यक्त होत असल्याचे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाच्या बैठका चालल्या असल्याचा गौप्यस्फोट प्रकाश आंबेडकरांनी केला आहे.

उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये बैठका सुरु असल्याची माहिती प्रकाश आंबेडकरांनी दिली आहे. याविषयी बोलताना वंचित आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर म्हणाले की, निवडणुका झाल्यानंतर उद्धव ठाकरे आणि भाजपा ही एकत्रित येणार आहे, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळं बहुजन समाजाने आणि मुस्लिम समाजाने यांना बळी पडू नये आणि यांना मतदान करु नये. कारण येणाऱ्या दिवसात उद्धव ठाकरे हे भाजप बरोबर जातील असा गौप्यस्फोट त्यांनी गोंदियामध्ये केला आहे. तर उद्धव ठाकरेंसोबत असलेले राष्ट्रवादी व कॉंग्रेस यांना मुस्लिम समाज असं सांगत आहे की त्यांच्याकडून लिहून घ्या की ते पुढचे पाच वर्ष तुमच्या सोबत राहतील. आता कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी मुस्लिमांना कशा पद्धतीने आश्वासन देते हे पाहणं देखील महत्वाचं आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असतानाच एक धक्कादायक बातमी समोर आली होती. उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची चर्चा सोमवारी सकाळपासून राजकीय वर्तुळात रंगली होती. तसेच संजय राऊत यांनीही अमित शाह यांची भेट घेतल्याचे कॉंग्रेस पक्षातील उच्चपदस्थ सूत्रांकडून सांगितले जात होते. यामुळे म हाराष्ट्राच्या राजकारणात नवा भूकंप होणार का, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, या सगळ्यावर आता ठाकरे गटातील एका उच्चपदस्थ नेत्याने प्रतिक्रिया दिली आहे. कॉंग्रेस आणि ठाकरे गटात जागावाटपाच्या मुद्द्यावरुन वाद जरुर आहे. पण ठाकरे गट विधानसभा निवडणुकीत एकट्याने लढण्याचा कोणताही विचार करत नाही. अशा प्रकारची कोणताही भेट झाली नसल्याची माहिती ठाकरे गटाच्या वतीनं देण्यात आली आहे. मात्र, राजकीय वरुळात सध्या विविध चर्चा होताना दिसत आहेत

## काय बोलता राव ?

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने महायुती, महाविकास आघाडी, वंचित आघाडी, वैगेरे वैगेरे करुन महाराष्ट्रातील विधानसभा मतदार संघातील उमेदवारांची आपापल्या परीणे उमेदवारी नांवे जाहिर करीत असताना लातूर विधानसभा मतदार संघातील उमेदवाराची कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवारी जाहिर न केल्यामूळे हे भिजत घोंगडे कशासाठी असावे, हे कळत नसले तरी लातूर शहर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचे माजी आमदार अमित देशमूख यांनी कालपासून प्रचार यंत्रणा सुरु केल्याची कुजबूज आहे. हे कसे काय कळतच नाही. मग यातील गौडबंगाल काय असावे, हे कळत नाही. म्हणून बोलतोय.

**काय बोलता राव,**

अरे, लातूर शहर विधानसभा मतदार संघातून भाजपाच्या वतीने डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी प्रचारास सुरुवात केलेली आहे. त्याच भाजपाचा दुजोरा नसला तरी भाजपा श्रेष्ठीने त्यांना नकार दिलेला नाही. औसा, निलंगा उमेदवारांची यादी जाहिर केली. पंरतू लातूर उदगीर आणि ग्रामीण ही नांवे जाहिर न करता महायुतीने महाविकास आघाडीला अडगळीत टाकल्यामूळे महाविकास आघाडीच्या नावावर लातूर शहर विधानसभा मतदार संघा मध्ये अमित देशमूख यानी बाभळगांव रस्त्यावरील राजीवनगर भागातून प्रचारास सुरुवात केली असताना पोलीसानी मज्जाव केल्यामूळे उबाठा सेनेच्या एका कार्यकर्त्याच्या घरात त्यानी बैठक घेवून लातूर शहरातील इतर भागात दौरा केल्याच्या बातम्या प्रसारीत केल्या असल्या तरी महाविकास आघाडीतून कोणता उमेदवार कोणत्या गटाचा कोण असेल, हे गुलदस्त्यात असल्यामूळे कॉंग्रेसची परंपरा मोडीत निघते की काय, अशीच उलटसूलट कुजबूज राजकीय वर्तूळात व्यक्त होताना दिसते आहे. मग बोला दाजीबा !

## भाजपचा बडा नेता, माजी मंत्री राष्ट्रवादीत; विदर्भात अजित पवारांची ताकद वाढली

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत इनकमिंग सुरु झाले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याचे चित्र होते. आता अजित पवारांनी भाजपच्या बड्या नेत्याला गळाला लावलय. माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केलाय. त्याम ुळे अजित पवारांना विदर्भात मोठे बळ मिळणार आहे. माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झालाय. त्यामुळे राष्ट्रवादीला विदर्भात बळ मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंदियात राष्ट्रवादीला बळ मिळणार आहे. राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफ ुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. राजकुमार बडोले यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचा पक्षात समावेश केल्यास पक्षाची स्थिती मजबूत होईल, असे अजित पवार म्हणाले.

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षात त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकती या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौडूरू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भाग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबाबदारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालिन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धार राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कित्तुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोटी रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदुकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमांच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होंगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातुर शहरातील व्यापाऱ्याशी साधला सुसंवाद

लातूर प्रतिनिधी : लातूररात कायदा सुव्यवस्था कायम राहावी, येथील सामाजिक सलोखा अबाधित राहावा यासाठी येथील नेतृत्वाने सातत्याने प्रयत्न केले आहेत, त्यामुळेच येथील उद्योग व्यवसाय भरभराटीला आलेला आहे, त्यातून लातूर शहर कायम प्रगतीपथावर राहण्यास मदत झाली आहे, असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.



सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी लातूर एमआयडीसी परिसरातील अजिंक्य सेल्स कॉर्पोरेशन, कृष्णा ट्रेडिंग कंपनी येथे संतोष तोष्णीवाल मित्र मंडळाच्या वतीने आयोजित व्यापारी सुसंवाद बैठकीस उपस्थित राहून सर्व व्यापारी मित्रांसोबत संवाद साधला या प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललित भाई शहा, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघटनेचे माजी अध्यक्ष वसंतराव पाटील, वामन धुमाळ, नागेश बावगे, सय्यद युसुफ, ईश्र्वर बाहेती, चंदुलाल बलदवा,आनंद बाहेती, राजेश तोष्णीवाल, कन्हैयालाल जंत्रे, परमेश्र्वर वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, प्रमोद मुंदडा, डॉक्टर हंसराज बाहेती, रतन बीदादा, सीए प्रकाश कासट, विष्णू भुतडा, हुकुमचंद कलंत्री, ओमप्रकाश बाहेती आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी तोष्णीवाल कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

यावेळी बोलतांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, लातूररात कायदा सुव्यवस्था कायम राहावी, येथील सामाजिक सलोखा अबाधित राहावा यासाठी येथील नेतृत्वाने सातत्याने प्रयत्न केले आहेत, त्यामुळेच येथील उद्योग व्यवसाय भरभराटीला आलेला आहे, त्यातून लातूर शहर कायम प्रगतीपथावर राहण्यास मदत झाली आहे, सलोख्याची ती परंपरा पुढेही चालू राहावी यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत या कामी जाणकार मंडळींचा कायम पाठिंबा आणि आशीर्वादही मिळत आले आहेत, ते पुढेही मिळत राहतील असा विश्र्वास या प्रसंगी व्यक्त केला,

संपूर्ण देशात आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रातील उद्योग व्यवसाय इतर राज्यात स्थलांतरित होत आहेत, कधी नव्हे ते राज्यत गुन्हेगारी वाढते आहे, राज्यातील जनतेच्या भविष्याच्या दृष्टीने या बाबी धोकादायक ठरत आहेत, ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्यात आता सत्तांतराची गरज निर्माण झाली असल्याचे प्रतिपादनही याप्रसंगी बोलताना केले.

महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघटनेचे माजी अध्यक्ष वसंतराव पाटील, वामन धुमाळ, नागेश बावगे, सय्यद युसुफ, संतोष तोष्णीवाल, सीए प्रकाश कासट, संजय पाटील खंडापूरकर यांनी मनोगत व्यक्त केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश तोष्णीवाल यांनी केले तर शेवटी आभार संतोष तोष्णीवाल यांनी मानले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातुर शहरातील अतुल फुटवेअरच्या नूतन दालनाला दिली सदिच्छा भेट

लातूर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण,



सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सोमवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी लातुर शहरातील शॉपर्स स्टॉपच्या समोरील अतुल ठक्कर यांच्या अतुल फुटवेअर नूतन दालनाला सदिच्छा भेट देऊन दालनाची पाहणी केली नामांकित दर्जाची पादत्राणे अत्याधुनिक दालनात उपलब्ध केल्याबद्दल ठक्कर कुटुंबीयांचे कौतुक करून त्यांना पुढील व्यवसायवाढीसाठी शुभेच्छा दिल्या

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव,माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख पिनाकीन ठक्कर लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शहा उद्योजक अजय ठक्कर डॉक्टर अशोक पोद्दार रवींद्र अग्रवाल व्यंकटेश पुरी आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी ठक्कर कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

## अंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत बाभळगाव महाविद्यालयाच्या खेळाडूंचे वर्चस्व कायम अंजली चौधरी धावणे स्पर्धेत तिन्ही गटात प्रथम

बाभळगाव : रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड



आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेमध्ये दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावच्या खेळाडूंनी मैदानी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन संपादन केले आहे. त्यामध्ये कु. अंजली चौधरी हिने ५००० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे व १०० मीटर धावणे या तिन्ही गटांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून मैदानी स्पर्धेवर महाविद्यालयाचे वर्चस्व कायम राखले आहे.

उर्वरित झालेल्या स्पर्धेमध्ये कु. सुरुची चौधरी हिने ५००० मीटर धावणे मध्ये तृतीय क्रमांक, कु. नेहा डोंगरे या खेळाडूने हातोडा फेक मध्ये प्रथम क्रमांक, गोळा फेक मध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. यश संपादन केलेल्या खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, दक्ष अकॅडमीचे प्रमुख राजकुमार अंबुलगे आणि बालाजी बालने यांचा महाविद्यालयामध्ये क्रीडा विभागाच्या वतीने यथोचित असा सत्कार करण्यात आला.

या निमित्ताने दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष आ. धीरज देशमुख, सचिव शाम देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. अजित भांजी, डॉ.अभिजीत बागडे, प्रा. संतोष कल्याणकर, हनुमंत शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

सत्कार समारंभाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ.दशरथ भिसे यांनी केले तर डॉ.नाना जाधव यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंदिर सेवा स्वच्छता अभियानास उत्तम प्रतिसाद

लातूर : विश्र्व हिंदू परिषदेच्या मंदिर आर्चक पुरोहित



आयामाच्या वतीने महाराष्ट्र आणि गोवा राज्यात मंदिर सेवा स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते या अभियानाला लातूर जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळाला.

सेवा स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी विश्र्व हिंदू परिषदेचे, बजरंग दलाचे कार्यकर्ते आणि मंदिर विश्र्वस्त यांनी गेली आठ दिवस नियोजन केलं होतं या अभियानात मंदिरच्या भक्तासोबतच परिसरातील नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते.

सकाळी सात ते अकरा या वेळेत लातूर महानगर, औसा, अहमदपूर ,उदगीर या या तालुक्यातील ग्रामदैवताच्या मंदिरासह विविध मठ, संस्थान अशा लहान मोठ्या ९२ मंदिरामध्ये सेवा स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

विश्र्वस्त मंदिराचे विश्र्वस्त आणि कार्यकर्त्यांनी मंदिराचा गाभारा ते अंगण आणि परिसराची संपूर्ण स्वच्छता केली आवश्यक असणाऱ्या ठिकाणी मंदिरे पाण्याने धुऊन ही काढण्यात आली या अभियानात ३२२ पुरुष आणि २० महिला विश्र्वस्त ,भाविक, कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला आणि त्यानंतर सामूहिक आरती करण्यात आली.

## महाविद्यालयातील कलावंताच्या उत्तम सादरीकरणाने प्रेक्षक गहिवरले

लातूर : येथील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व सहयोग शिक्षणशास्त्र महाविद्यालय,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१८ ते २१ ऑक्टोंबर २०२४ या दरम्यान आयोजित ज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२४ मध्ये पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर प्रमुख अतिथी शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, ज्येष्ठ संचालक बाबूराव तरगुडे ,संचालक राजेश्र्वर बुके, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, खट–उ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, वाणिज्य शाखा समन्वयक डॉ. विजयकुमार सोनी, पदव्युत्तर विभाग समन्वयक डॉ.यशवंत वळवी ,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ रत्नाकर बेडगे ,संघ व्यवस्थापक डॉ. मनोहर चपळे आदीची मंचावर उपस्थिती होती.



या कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत ज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि संगीत विभागातील प्रा.विश्र्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार व विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले.

कार्यक्रमाप्रसंगी विविध कलाप्रकारात नैपुण्य मिळवणाऱ्या कलावंतांचा यथोचित गौरव करण्यात आला.

या युवक महोत्सवात कथाकथन या कला प्रकारात महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. शिवाली मुकडे हीचा सुवर्णपदकासह विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाला.

लावणी या कलाप्रकारात कु.वैष्णवी स्वामी सर्वतृतीय समूहगीत पाश्र्चात्य सर्वतृतीय सहभागी विद्यार्थी आगलावे मिताली, सूर्यवंशी साक्षी, पांचाळ भक्ती, निर्मळ सानिया, सेलूकर सिद्धी, स्वामी स्वाती लोकसंगीत आर्केस्ट्रा सर्वतृतीय सहभागी विद्यार्थी शिंदे गणेश, कुंभार रोहित, पांचाळ कैवल्य, दाडगे तुकाराम, येवणगे विजय, शेलार अजय, पांचाळ , विकास ,आगलावे मिताली, पांचाळ भक्ती, लोकनृत्य या कला प्रकारात सर्वतृतीय सहभागी कलावंत कार्तिक रसाळ ,नेहा गायकवाड ,समृद्धी शिंदे , वैष्णवी स्वामी ,सुनील कोल्हे, सानिया निर्मळ ,अनिकेत राऊत, शीतल चव्हाण , ज्ञानेश्र्वर, वाघमारे साईनाथ स्वामी विडंबन या कला प्रकारात सर्वतृतीय सहभागी कलावंत भुरे सत्यम, वाघमारे ज्ञानेश्र्वर, मस्के वैभव, स्वामी वैष्णवीया सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील आप्पा मिटकरी, राजेश्र्वर बुके, बाबूराव तरगुडे यांच्या शुभहस्ते, शाल, ग्रंथ पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले.

या सर्व कला प्रकारात प्रशिक्षण देणारे प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार , धम्मपाल सकपाळ, प्रवीण कसबे, डॉ. अश्र्विनी रोडे, डॉ. राहूल डोंबे, प्रा. सरस्वती बोरगावकर यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित यशवंतांचे पालक नातेवाईक यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की ,संगीत ही विश्र्वाची भाषा असून संगीत ही मनामनाला व्यक्ति व्यक्तिला जोडणारी कला आहे. कलावंत आपल्या आनंदाबरोबर कलेच्या माध्यमातून दुसऱ्यालाही आनंदित करत असतो असे ते म्हणाले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात आदिनाथ सांगवे म्हणाले की, कला ही सौंदर्याचा उत्कट आविष्कार असते यातून आपल्या भावभावना व्यक्त होत असतात. रंग, रेषा, स्वर, ताल यातून व्यक्ती अभिव्यक्त होत असतो. कलावंताची कला ही समाजाचा गौरव वाढवणारी गोष्ट असते. त्यामुळे कला आणि कलावंत यांचा सन्मान समाजातल्या प्रत्येक घटकांनी करावा असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे यांनी केले. मनोगत प्राचार्य डॉ.संजय गवई यांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अश्र्विनी रोडे, डॉ. राहूल डोंबे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. नागेश जाधव, प्रा .व्यंकट दुडिले, प्रा. डॉ.गीता गिरवलकर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, बालाजी डावकरे, बालाजी होनराव, संदीप मोरे, शुभम बिराजदार, नंदू काजापुरे आदींनी परिश्रम घेतले.

## दयानंद विज्ञानमध्ये ओस्वाल्ड थीओडोर व्हरी यांची जयती साजरी

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२१



ऑक्टोबर २०२४ रोजी ओस्वाल्ड थीओडोर व्हरी यांची १४७ वी जयंती साजरी करण्यात आली. वैज्ञानिकांच्या जयंती निमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य आणून राबवत आहे. विद्यार्थी वैज्ञानिकांच्या संशोधनातून प्रेरणा घेऊन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करून स्वतःबरोबरच महाविद्यालयाचेही नावलौकिक करतील असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.कोमल गोमारे यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.सुभद्रा परगे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

यावेळी जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी. प्रथम वर्षातील स्नेहा कांबळे या विद्यार्थिनीने वैज्ञानिकाबद्दलची माहिती प्रकाशझोतात आणली. ओस्वाल्ड थीओडोर व्हरी यांचा जन्म २१ ऑक्टोबर १८७७ रोजी झाला.ते एक कॅनेडात जन्मलेले अमेरिकन जीवाणुशास्त्रज्ञ होते,आनुवंशिकतेसाठी डीएन (डीऑक्सिरिबोन्युक्लिक आम्ल) महत्त्वपूर्ण भूमिका बजावित असल्याचे त्यांच्या संशोधनातून निश्र्चित झाले. त्यामुळे रेणु अनुवंशशास्त्रासारख्या नविन विज्ञान शाखेचा पाया रचला गेला. त्यांचा मृत्यू २० फेब्रुवारी १९५५ रोजी झाला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिध्देश्र्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ. नितीन चव्हाण, प्रा. स्वरूप गावकरे, प्रा.अनुराधा शिंदे पाटील, प्रा. प्रियंका कानडे, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोमातेच्या संवर्धनात संस्कृतीचे जतन - लातूरच्या एमआयडीसी परिसरात अपनी राधाकृष्णा गोशाळेचे भूमिपूजन

लातूर / गाय जगाची जननी आहे, इतर प्राण्यांपेक्षा गायीमध्ये अनेक सुसंस्काराचे दर्शन होते, त्यामुळे गोमातेच्या संवर्धनात संस्कृतीचे जतन होते असे प्रतिपादन गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज जोधपूर यांनी केले, येथील अतिरिक्त एमआयडीसी परिसरात उभरण्यात येणाऱ्या अपनी गोशाळेच्या भूमिपूजन सोहळा पार पडला यावेळी ते बोलत होते. सोहळ्यासाठी हभप श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांची उपस्थिती होती.

लातूर शहरातील एका मॉर्निंग वॉक ग्रुपने परळी येथील रामरक्षा गोशाळेची प्रेरणा घेत मागील दहा वर्षापासून लातुरात गोमातेची सेवा सुरू केली, त्यातून शहरालगत असलेल्या पेठ येथे गोशाळेची निर्मिती केली, हळूहळू या संकलपनेला मूर्त स्वरूप आले असून आज लातूर एमआयडीसी परिसरात या उपक्रमासाठी दानशूर गो सेवकांच्या मदतीने आठ एकरात ही गोशाळा उभारणार आहे. याचे भूमिपूजन गोवत्स राधाकृष्ण महाराज जोधपूर आणि हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते झाले, यावेळी गो भक्तांना संदेश देत असताना राधाकृष्ण महाराज म्हणाले की गो शाळा म्हणजे केवळ प्राणी रक्षण नव्हे तर परंपरेप्रमाणे चालत असलेल्या भारतीय सुसंस्कारांचे संरक्षण करणे, सुखा चारा खाऊन गाय सकस दूध देते, तिच्यामध्ये दातृत्वाचा भाव आहे, तोच गुण माता भगिनींमध्ये असल्याचे मत राधाकृष्ण महाराज यांनी व्यक्त केले. यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी अपनी गोशाळा प्रतिष्ठानच्या सर्व संचालक मंडळाचे कौतुक करून गोमातेची सेवा हे पुण्य कर्म असल्याचे सांगितले. या भूमिपूजन सोहळ्यासाठी लातूर शहरासह जिल्ह्यातील गोसेवक उपस्थित होते.

## नाफेड अंतर्गत लातूर जिल्ह्यात सुरू झालेल्या १५ सोयाबीन खरेदी केंद्राचा शेतकर्यांनी लाभ घ्यावा

लातूर : केंद्र सरकारने शेतकर्यांच्या शेतीमालाला चांगले दर मिळावेत म्हणून सोयाबीन व इतर २३ धान्याचे दर निश्चित केलेले आहे. यामध्ये केंद्र शासनाने सोयाबीनला ४८९२ रूपये दर दिलेला आहे. शासनाने त्याप्रमाणे खरेदी करण्याची मागणी राज्याच्या कृषी विभागाचे डेप्युटी सचिव संतोष देशमुख, मार्केटिंग फेडरेशनचे कार्यकारी संचालक पाटील व नाफेडचे डेक्काने यांच्याकडे भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केली होती. त्याची दखल घेऊन त्यांनी संबंधित जिल्हा प्रशासनाला सूचना देऊन नाफेड अंतर्गत १५ सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले आहेत. या कामी राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांचेही सहकार्य मिळाले. त्यामुळे सुरू करण्यात आलेल्या खरेदी केंद्रामुळे शेतकर्यांच्या सोयाबीनला योग्य भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकर्यांतून समाधान व्यक्त केले जात आहे. लातूर जिल्ह्यामध्ये १५ खरेदी केंद्र सुरुवात केली आहेत, यामध्ये जागृती प्रगती बिजोत्पादन प्रक्रिया पणन सहकारी संस्था मर्या.कडबा बाजार लातूर , जिजामाता मिरची प्रक्रिया पणन सहकारी संस्था मर्या. सेलू (बु) ता.लातूर, औसा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म.औसा, रेणुका शेतकरी खरेदी विक्री संघ मर्या रेणापूर, चाकूर तालुका खरेदी विक्री संघ मर्या. ऑईल मिल गोदाम बोथी रोड चाकूर, शिषाद्री कृषी वस्तू पुरवठा सहकारी संस्था मर्या आष्टा ता.चाकूर, स्व.रामचंद्रराव पाटील तळेगावकर तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या.उदगीर, तालुका खरेदी विक्री संघ मर्या देवणी, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या अहमदपूर, हालसी (तु) विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या.हालसी (तु) निलंगा, रंगराव पाटील कृषी उत्पन्न (खाजगी) बाजार समिती लोणी–उदगीर, विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या.सताळा ता.अहमदपूर, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या.शिरूर ताजंबद ता.अहमदपूर, विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या.हालकी ता.शिरूर अनंतपाळ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या कुणकी ता.जळकोट आदी १५ ठिकाणी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यात आलेले असून ते खरेदी केंद्र त्वरीत वाढवावेत. अशी मागणी डी.एम.ओ. लातूर यांच्याकडे केली आहे. सध्या चालू असलेल्या केंद्रावरती शेतकर्यांनी सोयाबीन विक्री करून योग्य तो दर मिळवावा आणि यात काही अडचण आल्यास आपल्याशी संपर्क साधावा असे आवाहन भाजपा नेते माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केलेले आहे.

